



	5½ MT
1. TOTAL LAND AREA AS PER 7-12 RECORD = 0.14 HECT.	=1400.00
MEASUREMENT PLAN=0.0750HECT	= 750.00
2. AREA UNDER RESIDENTIAL USE	~~753.00~~ 757.00



PROPOSED RESIDENTIAL LAYOUT OF SURVEY NO.107/9A1, MOUZA-DEWAI GOVINDPUR RAI., TAH. AND DIST.-CHANDRAPUR BELOGING TO, SOU SHASHIKALA VASANTRAO MAILARPAWAR.

Smt. S. V. Mailarpawar

Executive Engineer
Municipal Council
Chandrapur

CAD 29 13 201 82

2.62

43

स.मा.ज्ञा.क्र./एनएपी-३४/२०११-२०१२
मौजा देवई गोविंदपुर रै. प.ह.न. ११ ता. चंद्रपूर
जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय, चंद्रपूर.
दिनांक :- २८/१२/२०१२

वाचले :- १) सौ. शशीकला वसंतराव मेलारपवार रा.चंद्रपुर यांचा अर्ज.
२) उपविभागीय अधिकारी चंद्रपूर यांचे प्र.क्र. [illegible]
मौजा देवई गोविंदपुर रै. नझील दिनांक ३९.११.२०११ चा प्रस्ताव
३) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ (१) आणि कलम १२३ सह.
४) नगररचनाकार चंद्रपूर यांचे जा.क्र.अकृषी/मौजा दे.गो.रै./नरचं/१२४८
दिनांक ३.९.२०१०

आदेश

सौ. शशीकला वसंतराव मेलारपवार रा.चंद्रपुर यांनी मौजा देवई गोविंदपुर रै. प.ह.न. ११ तहसिल चंद्रपुर येथील स.न. १०८/१ अ १ पैकी अंदाजे ७५०.०० चौ.मीटरला निवासी झोनदरात अकृषिक परवानगी मिळण्याबाबत उपविभागीय अधिकारी चंद्रपुर यांचेकडे अर्ज सादर केला. सदर अनुषंगाने संबंधित विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र मागविण्यात आले व जाहिरनामा करण्यात आला. कोणाचेही आक्षेप विहीत कालावधीत प्राप्त झालेले नाहीत. प्रकरणात खालील नमुद केलेल्या विभागांचे ना हरकत प्रमाणपत्र मुदतीत प्राप्त झालेले आहेत.

१. नगररचनाकार चंद्रपूर
२. जिल्हा अधिक्षक अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर
३. कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कंपनी चंद्रपूर
४. प्रभारी अधिकारी, भूसंपादन, चंद्रपूर.
५. जिल्हा पुनर्वसन अधिकारी, चंद्रपुर
६. मुख्याधिकारी, नगर परिषद चंद्रपूर
७. उपविभागीय अधिकारी, चंद्रपुर यांचे प्रस्ताव

अर्जदाराने गाव नमुना ७/१२ चा उतारा, तलाठी अभिन्यास, अधिकार अभिलेख पत्रीची प्रत, मोजणी नकाशा व अभिन्यास सादर केलेले आहे. तसेच वरील सर्व विभागाची अकृषिक वापरासाठी जमीन हरकत नाही असे कळविलेले आहे

अर्जदारास विषयांकीत प्रकरणी निवासी वापरास अकृषिक परवानगी मंजूर करावयाची असल्यामुळे अकृषक सारा आकारणी करावयाचे क्षेत्र ७३८.०० चौरस मिटर ला अकृषिक सारा रुपये ०.१६ पै. प्रति चौ.मिटर प्रमाणे रुपये ५१३/- तसेच त्या वरील नियमानुसार उपकर अर्जदाराने भरणा करणे करारी. तसेच परावर्तीत कर अकृषीक सनद चे दाखल रक्कम रुपये २०६४/- तात्काळ भरणा करावी.

..२..

CIS
९६२ | ८ | २०

वरील बाबी विचारात घेता महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व तदा खालील नियम १९६७ व अंतर्गत तरतुदीस अधिन राहुन महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४(१) अन्वये अर्ज सादर केल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये असलेल्या अधिकाराचा अनुसरुन मी जिल्हाधिकारी चंद्रपूर, खालील अटीस अधिन राहुन श्री. आशिकला बसंतराव मैलारवार रा.चंद्रपूर यांनी मौजा देवई गोविंदपूर ई. ग.ह.न. ११ तहसिल चंद्रपूर येथील सुधन. ३०७/१ क्र.१ पैकी आराजी ७५०.०० चौ.मिटरला कृषिक जमीनीचा खालील विवरणपत्रा प्रमाणे अकृषीक करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

AREA STATEMENT :-

1	TOTAL LAND AREA AS PER 7-12 RECORD	1400.00 SQ.MT
2	MEASUREMENT PLAN	750.00 SQ.MT
3	AREA UNDER RESIDENTIAL PLOTS	737.20 SQ.MT

१) ज्या प्रयोजनासाठी अकृषिक जमीन दिलेली आहे त्या कारीता जिल्हाधिकारी यांचे पुर्व परवानगी शिवाय इतर कारणा साठी वापर करता येणार नाही.

२) अनुज्ञाही यांनी निवासी वापराचे सुरुवात केल्यापासुन एक महिन्याचे आत तलाठी यांचे मार्फत तहसिलदार यांना वापर सुरु केल्याचा दिनांक कळविला पाहिजे.

३) अनुज्ञाही यांनी विकासी अकृषिक वापरासाठी परवानगी मिळाल्याचे दिनांकापासुन दरसाल प्रचलीत रु. ०.१० न.पै. प्रति चौ.मी. दराने आकारणी दरात येणारी सुलभ संलग्नित योग्य अकृषिक दर पुर्वलक्षी प्रभावाने जरी तसी तरतुद संपुष्टात आला असला तरी लागू झाल्यास ही भरण्यास बंधनकारक राहील.

४) वरील अट क्र. ३ मध्ये नमुद केलेल्या अकृषिक आकारणीचा दर हा सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरी प्रमाणे पुर्वलक्षी पध्दतीने बदलण्यास पात्र राहील. या व्यतिरिक्त स्थानिक उपकर मात्रेही बंधनकारक राहील.

५) आदेशातील कोणत्याही अटीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचेस कारवाई करण्यास सक्षमतेने व अशा प्रकारे केलेला दंड हा जमीन महसुलाची थकबाकी समजून वसुल करण्यात येईल.

६) अनुज्ञाही यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम १९६८ नुसार घर बांधकाम करीता आवश्यक असल्यास बांधकाम नकाशे सादर करुन मंजुर करुन घेणे बंधनकारक राहील.

७) अकृषिक परवानगीचा अनुषंगाने अभिन्यास मंजूर झालेल्या दिनांकापासून एक वर्षांत सनदीचा अकृषिक वापर सुरु न केल्यास अकृषिक परवानगी रद्द होईल.

८) विषयांकीत जमीनेवर बांधकाम सुरु करण्यापुर्वी बांधकाम नकाशे सहायक संचालक, नगररचना, चंद्रपूर मंजूरी घ्यावी.

..३..

REGISTERED
E 62 | 9 | 20
CHANDRAPUR

९) सदर अभिन्यासाची तालुका निरिक्षक भूमी अभिलेख, यांचेकडून जागेवर आखणी करुन घ्यावी. अभिन्यासानुसार आखणी करीत असतांना संमोवतालील मंजूर अभिन्यासातील रस्त्यांशी योग्य रितीने समन्वय साधणे आवश्यक आहे. विषयांकीत जमीनीसाठीचा प्रस्तावित पोच रस्ता मोजणी करुन तो मोजणी नकाशावर दर्शवावा. आखणी नंतर काही फरक आढळून आल्यास जागेवर आखणी केल्याप्रमाणे किंवा फरक रस्त्यास जागेवर आखणी केल्यानुसार बदलून अभिन्यासाचा मोजणी नकाशासह आखणी अभिन्यासाच्या वास्तुशास्त्रज्ञांचे सहीचे चार प्रतीत जागेवरील अधिकारी नगर रचना कार्यालयास मंजुरीस्तव सादर करुन त्यांचे मंजूरीनंतर या कार्यालयास सादर करावे.

१०) अभिन्यासातील जागेत काही वृक्ष असल्यास भूखंड आखतांना ती नष्ट न करता विद्यमान स्थितीत कायम ठेवावीत.तसेच रस्त्याचे दुतर्फा व बांधकाम परिसरातील मोकळ्या जागेत जास्तीत जास्त वृक्ष रोपण करुन त्याची देखभाल स्वखर्चाने करावी लागेल.

११) विद्यमान जुने/नविन सर्व प्रकारचे इमारत बांधकाम नगर पालिका/नगरपरिषद/ग्राम पंचायत ला लागू असलेल्या इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियमावली नुसार दामढिल्क अंतराचे बेत असल्यास पाडून टाकावे लागेल.

१२) विषयांकीत जमीनीतुन जाणाऱ्या विद्युत वाहीनी पासूनचे सामासिक अंतर हे अदयक्षात इंडियण इलेक्ट्रीसीटी रुल्स व तुरुसी, तसेच म.रा. विद्युत मंडळाच्या अद्यावत नियमानुसार असावे.

१३) विषयांकीत जागेतुन उच्च दाबाची विद्युत वाहीनी किंवा दुरध्वनी जात असेल तर तीं रस्त्याचे फडेला रस्त्यासहीत केल्याशिवाय त्या वर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.

१४) २२० के.व्ही. च्या वरील तीन लाईनच्या दोन्ही बाजुने प्रत्येकी २६.०० मिटर लांग क्लिअरन्स करावी सोडण्यात यावी.

१५) प्रस्तावित बांधकाम हे रेल्वे लाईनच्या हददी पासून ३० मिटर अंतराचे आत नसावे.

१६) विषयांकित जमीनीतुन पाण्याचे स्त्रोत असल्यास संबंधित विभागाचे (पाटबंधारे/जलसिंचन विभाग) आवश्यकते ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल. विषयांकित जमीनीस पोच असणे आवश्यक राहील.

१७) भावीष्य काळात भुखंडाचे विभाजन करता येणार नाही.

१८) इतर स्थानिक प्राधिकरणाचे नियमावे पालन करावे.

१९) प्रस्तावित लेआऊट चे सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था व सिध्दलाईन चे काम आवेदकाने स्वखर्चाने करावे लागेल. तसेच उपरोक्त परिसरातील सांडपाणी रस्त्यावर वाहून येणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

..४..

SUB REGISTRAR
CHANDRAPUR
२६/१०/२०
2012

२०) रस्त्याच्या मध्यरेषेपासून इमारत रेषेचे अंतर ५०.०० मिटर राहील. हया रेषेच्या आत कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करता येणार नाही.

२१) रस्त्याच्या मध्यरेषेपासून नियंत्रण रेषेचे अंतर ५०.०० मिटर अंतरावर राहील. हया रेषेच्या आत सां.बांधकाम विभागाच्या पूर्व परवानगी शिवाय कोणतेही बांधकाम/कुंपण घेता येवू नये.

२२) रस्त्यावर कोणत्याही प्रकारचे कॉलीन (सी.डी. वर्क्स) इत्यादी पूर्व परवानगी शिवाय करण्यात येवू नये.

२३) राष्ट्रीय महामार्गापासून ६५.०० मिटरचे आत कोणतेही बांधकाम करण्यात येवू नये.

२४) अभिन्यास मोजणी की तालुका निरिक्षक भूमी अभिलेख यांचेकडे तात्काळ भरणा करावी.

२५) अभिन्यास मंजूरी शिवाय जागेचे विभाजन करता येणार नाही

२६) अभिन्यास मंजूरी शिवाय नोंदणी अधिकाऱ्यांनी खरेदी विक्रीचे व्यवहाराची नोंदणी करु नये.

२७) सदर प्रकरणातील सर्वे नंबर १०७/१ अ १ चे अभिन्यास मध्ये निवासी भुखंड खालील एकूण क्षेत्रफळ ८३८.०० चौ.मी. आहे. सदर अभिन्यासाच्या जागेवर रस्ता, विद्युत, पिण्याचे पाणी व सांडपाण्याची व्यवस्था या किमान नागरी सुविधा जागेत मालकाने/विकासकाने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

२८) सदर अभिन्यासातील जागेवर दिलेले रेखांकन सक्तीने पाळणे अत्यावश्यक बंधनकारक राहील.

२९) सर्वे नंबर १०५/१ अ १ पैकी एकूण ७५०.०० चौ.मी. असुन अभिन्यासातील भुखंडाखालील क्षेत्र ५३७.०० चौ.मी. असल्यामुळे सदरहु अभिन्यासातील भुखंडाखालील क्षेत्रावर (खुली व सार्वजनिक जागा वगळून) आकृषिक सारा आकारण्यात यावा.

३०) ही परवानगी मुंबई भुजलहीवाट कायदा, नगर पालीका अधिनियम व मुंबई महासार अधिनियम १९६५ मधील तरतुदीस अनुसरुन राहील.

३१) सर्व संबधीत विभागानी नमुद केलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक आहे.

३२) अभिन्यासाची कागदपत्रे चुकीचे आढळून आल्यास किंवा सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेचे दृष्टीने अहवाल प्राप्त झाल्यास आकृषिक परवानगी देता रद्द करण्यात येईल. कागदपत्र तसेच क्षेत्राचे संपादनाबाबत सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील. याबाबत कोणताही वाद/न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास परवानगी रद्द करण्यात येईल.

..७..



३२) अकृषिक आदेश मिळाल्यानंतर आदेशापासून एक महिन्याचे आंत कलम ४४ (६) अन्वये सनद कार्यान्वीत करण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रासह हजर राहावे. सनद कार्यान्वीत न केल्यास हा अकृषिक परवानगीचा आदेश रद्द करण्याची कार्यवाही करण्यांत येईल.

(मौजा देवई गोविंदपूर रे. प.ह.न. ११ तहसील चंद्रपुर, येथील स.न. ४०/१ व २ पैकी आराजी ७५०.०० चौ.मीटरला निवासी वापरास अकृषिक परवानगी मिळण्याबाबत)

स्वा/-
(विजय वाघमारे)
जिल्हाधिकारी,चंद्रपूर

प्रत माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

१. उपविभागीय अधिकारी, चंद्रपुर यांना त्यांचे कार्यालयाचे मुळ प्रकरण क्रमांक १४०/एनएपी-३४/२०१०-२०११ मौजा देवई गोविंदपुर रे. सह आदेश व अभिन्यास पुढील कार्यवाहीस अग्रेषित.
२. तहसिलदार चंद्रपुर उपरोक्त आदेशाची नोंद तालुका नमुना दोन व गांव नमुना दोन मध्ये घेवुन तसा अहवाल उपविभागीय अधिकारी याचे मार्फत या कार्यालयास सादर करावा. सोबत अभिन्यास जोडला आहे.
३. तालुका निरिक्षक भूमी अभिलेख, चंद्रपुर यांना उचित कार्यवाहीस अग्रेषित.
४. नगर रचनाकार, चंद्रपूर ५. दुय्यम निबंधक चंद्रपुर
६. मुख्याधिकारी, नगर परिषद चंद्रपुर
७. सौ. शशीकला बसंतराव मेलारपवार रा.चंद्रपुर
८. कार्यालयीन प्रत.

जिल्हाधिकारी, चंद्रपूर(सांकेतीत)





CRD
९६२/१२/२०
2012